www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

●LOKRAKSHANAY ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

●Executive editor- Aniket Ghanshyam Bhankal ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-234 ● Friday, 02 February 2024 ●Pages-04 ●Rs.2/-

## अनमोल विचार

"स्वतःला सोन्याच्या नाण्यासारखे बनवा, जे नाल्यात पडले तरी त्याचे मूल्य कमी होत नाही."

## लक्षवेधी

### दक्षिण भारताला वेगळा देश बनविण्याची मागणी; डीके शिवकुमार यांच्या खासदार भावाचे वक्तव्य

**नवी दिल्ली :** कर्नाटकचेकॉंग्रेस खासदार डी के सुरेश यांनी अर्थसंकल्पानंतर वादग्रस्त वक्तव्य केले आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्र डी के शिवकुमार यांचे भाऊ असलेल्या सुरेश यांनी दक्षिण भारताचा निधी उत्तर भारतासाठी वळविला जात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. यामुळे दक्षिण भारतासाठी वेगळ्या देशाची मागणी करावी लागेल, असे वक्तव्य सुरेश यांनी केले आहे. यावरून मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता असून भाजपाने सुरेश यांच्यावर टीका केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. यानंतर पत्रकारांशी बोलताना डीके सुरेश यांनी वरील वक्तव्य केले आहे. केंद्राने आम्हाला जे पैसे देणे बाकी आहेत ते जरी आम्हाला दिले तर ते पुरेसे होईल.

### ज्ञानवापीच्या 'व्यास' तळघरात बुधवारी रात्रीपासूनच पूजेला प्रारंभ !

**वाराणसी :** येथील ज्ञानवापी परिसरातल्या व्यास तळघरात जिल्हा न्यायालयाच्या आदेशानंतर ३१ वर्षांनी पूजेला प्रारंभ करण्यात आला. ३१ जानेवारीला न्यायालयाने दुपारी ४ च्या सुमारास पूजा करण्यास आदेश दिल्यानंतर जिल्हाधिकार्यांनी पूजेची व्यवस्था करून दिल्यानंतर रात्री ११ च्या सुमारास पूजा आणि शयन आरती करण्यात आली. तळघरात मूर्ती ठेवून पूजन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून श्री गणेश आणि लक्ष्मीदेवी यांची आरती करण्यात आली. तळघराच्या भिंतीवरील त्रिशूळासह इतर धार्मिक प्रतीकांचीही पूजा करण्यात आली. तळघराच्या मार्गावर लावण्यात आलेले अडथळे आणि लोखंडी कुंपण हटवण्यात आले आहे.

### 'वाढती आर्थिक तूट ही चिंताजनक बाब'; विरोधकांची केंद्रीय अर्थसंकल्पावर सडकून टीका

**नवी दिल्ली :** गुरुवारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताच विरोधकांनी सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. अर्थमंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण सुरू असतानाच प्रसारमाध्यमांशी संवाद साधणारे कॉंग्रेस नेते मनीष तिवारी म्हणाले की, आर्थिक तूट 'अत्यंत चिंताजनक' आहे. 'अत्यंत चिंताजनक बाब म्हणजे वाढती आर्थिक तूट, कारण अर्थमंत्र्यांनी सादर केलेले आकडे हे स्पष्टपणे दाखवतात की या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात 18 लाख कोटींहून अधिक निधी आर्थिक तूट दर्शवत आहे आणि ही संख्या आणखी वाढणार आहे', असं तिवारी म्हणाले.

### अर्थसंकल्पावर CM शिंदेंची प्रतिक्रिया म्हणाले, 'गेल्या ६० वर्षांत जे निर्णय..'

**नवी दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी सकाळी 11 वाजता संसदेत आर्थिक वर्ष 2024-25 चा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. निवडणुकीपूर्वी सादर होणारा मोदी सरकारच्या चालू कार्यकाळातील हा शेवटचा अर्थसंकल्प होता. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात सुमारे तासभर भाषण केले. अर्थसंकल्पाबाबत देशभरातील नेत्यांच्या प्रतिक्रियाही येऊ लागल्या आहेत. रोटी, कपडा, मकान देणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. गेल्या ६० वर्षांत जे निर्णय झाले नाहीत, ते गेल्या १० वर्षांत झाले. गरीब, शेतकरी, महिला व तरुण या चार प्रमुख घटकांना त्यांनी न्याय दिला. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम कसं करावं, हे त्यांनी दाखवून दिलं.

### 'ज्ञानवापी'मध्ये पूजेला परवानगी दिल्याने असदुद्दीन ओवेसी संतापले, म्हणाले - 'हा चुकीचा निर्णय..'

**वाराणसी :** राज्यसभा खासदार सुब्रह्मण्यम स्वामी यांनी म्हटले आहे की, ज्ञानवापी आणि कृष्णजन्मभूमीच्या जीर्णोद्धारासंदर्भातील जनहित याचिका त्वरित सूचीबद्ध करण्याची विनंती करण्यासाठी मी आता सर्वोच्च न्यायालयात जाईन. वाराणसीच्या जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशांसमोर अर्ज दाखल करून आम्हीही या खटल्यात पक्षकार होण्याचा निर्णय घेतला आहे. या बाबत असदुद्दीन ओवेसी म्हणतात, ज्ञानवापीमध्ये पूजेची सवलत देण्याबबातचा निकाल देणाऱ्या न्यायमूर्तींचा काल निवृत्तीचा दिवस होता. १७ जानेवारी रोजी त्यांनी जिल्हा दंडाधिकारी यांची रिसीव्हर म्हणून नियुक्ती केली होती. आता तुम्ही तळघरात पूजा करण्याचा अधिकार देऊन संपूर्ण प्रकरण निकाली काढले आहे.

### BCCI च्या माजी अध्यक्षांच्या कंपनीवर ईडीचा छापा; इंडिया सिमेंटच्या 'रेकॉर्ड'ची तपासणी

**नवी दिल्ली :** तामिळनाडूतील अंमलबजावणी संचालनालयाच्या (ED) पथकाने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (BCCI) माजी अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांच्या कंपनीवर छापा टाकला आहे. बीसीसीआयचे माजी अध्यक्ष एन श्रीनिवासन हे इंडिया सिमेंट्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष आहेत. इंडिया सिमेंट ही देशातील सर्वात मोठ्या सिमेंट कंपन्यांपैकी एक आहे. महसुलाच्या बाबतीत शेअर बाजारात सूचिबद्ध असलेली ही देशातील नवव्या क्रमांकाची सर्वात मोठी कंपनी आहे. इंडिया सिमेंटचे तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा येथे ७ प्लांट आहेत. विशेष बाब म्हणजे २००८ ते २०१४ पर्यंत इंडिया सिमेंट्सकडे इंडियन प्रीमिअर लीगची (IPL) फ्रँचायझी चेन्नई सुपर किंग्जची थेट मालकी होती.

### 'मोदींसोबत नाही, त्याला जेलमध्ये टाका हेच धोरण'; हेमंत सोरेन कारवाईवरून कॉंग्रेसची टीका

**नवी दिल्ली :** कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी ईडीने हेमंत सोरेन यांच्यावर अखेर अटकेची कारवाई केली आहे. ईडीकडून अटकेच्या हालचाली सुरू झाल्यानंतर हेमंत सोरेन यांनी राज्यपालांकडे जात मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजीनामा देऊन सोरेन हे घरी पोहोचताच ईडीने त्यांना अटक केली. यावरून कॉंग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. जे लोक पंतप्रधान मोदी यांच्यासोबत नाहीत, त्यांना जेलमध्ये टाकण्याचे काम केले जात आहे, असे सांगत कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रावर निशाणा साधला. मल्लिकार्जुन खरगे यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे.

# येत्या 100 वर्षांत 'भारत मध्य पूर्व-युरोप व्यापार कॉरिडॉर' बनणार जागतिक व्यापाराच केंद्र; अर्थमंत्री सीतारामन यांना विश्वास

## भाजप सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील अंतरिम अर्थसंकल्प गुरुवारी सादर

**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात त्यांनी भारत मध्य पूर्व-युरोप व्यापार कॉरिडॉर (IMEC) चा उल्लेख केला आणि हा कॉरिडॉर येत्या 100 वर्षांत जागतिक व्यापाराच केंद्र बनेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

कोविड महामारीनंतर एक नवीन जागतिक व्यवस्था उदयास येत आहे. जग अतिशय कठीण काळातून जात असताना भारताने G20 चे आयोजन केले होते. साथीच्या रोगामुळे अन्न संकट, खतांचा तुटवडा, अन्न आणि वित्तपुरवठा अशा परिस्थितीत भारताने यशस्वीरित्या मार्ग काढला काढल्याचं त्यांनी सांगितलं.

गेल्या वर्षी G20 शिखर परिषदेदरम्यान जाहीर झालेला भारत मध्य पूर्व-युरोप व्यापार कॉरिडॉर भारत आणि संपूर्ण जगासाठी गेमचेंजर ठरणार आहे. निसर्गासोबत समृद्धी मिळवणे आणि प्रत्येकाला त्यांच्या क्षमतेपर्यंत पोहोचण्याची संधी देणे हे विकसित भारताचे ध्येय आहे. हा कॉरिडॉर येत्या 100 वर्षांत जागतिक व्यापाराचं केंद्र बनेल आणि हा कॉरिडॉर भारतीय भूमीवर सुरू झाला याची इतिहासात याची नोंद, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

क्टएउ हा भारताला मध्य-पूर्वेद्वारे युरोपशी जोडणारा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. गेल्या वर्षी भारतात झालेल्या G-20 शिखर परिषदेत या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर 9 सप्टेंबर रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आणि त्याचे वर्णन ऐतिहासिक करार म्हणून करण्यात आलं होतं. भारताव्यतिरिक्त सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणाऱ्या देशांमध्ये अमेरिका, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती (यूएई), युरोपियन युनियन, फ्रान्स, इटली आणि जर्मनी या देशांचा समावेश आहे.

या अंतर्गत एक मोठ्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील जाईल. ज्यामध्ये भारत रेल्वे आणि समुद्राच्या माध्यमातून युरोपशी जोडला जाईल. याच्याशी निगडित देशांसाठी व्यापार आणि दळणवळण खूप सोपे होईल. हा प्रकल्प कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये विकासासाठी पायाभूत सुविधांची कमतरता भरून काढेल, असा विश्वास आहे. भारतातील मुंबई ते यूएई असा सागरी मार्ग तयार करण्यात येणार आहे. हे शिपिंग नेटवर्क रेल्वे नेटवर्क तयार करून संपूर्ण मध्य पूर्वेला जोडले जाईल. रेल्वेचे जाळे वअए, सौदी अरेबिया, जॉर्डन आणि इस्त्रायलपर्यंत विस्तारेल. मध्यपूर्वेमध्ये टाकलेले हे रेल्वेचे जाळे पुन्हा एकदा सागरी मागार्शी जोडले जाणार आहे. इस्त्रायलच्या हैफा बंदर ते इटली आणि इस्त्रायल ते फ्रान्स रेल्वे नेटवर्क दोन सागरी मार्गांशी जोडले जाणार आहे.

### काय आहे IMEC?

IMEC हा भारताला मध्य-पूर्वेद्वारे युरोपशी जोडणारा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. गेल्या वर्षी भारतात झालेल्या G-20 शिखर परिषदेत या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर 9 सप्टेंबर रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आणि त्याचे वर्णन ऐतिहासिक करार म्हणून करण्यात आलं होतं. भारताव्यतिरिक्त सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणाऱ्या देशांमध्ये अमेरिका, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती (यूएई), युरोपियन युनियन, फ्रान्स, इटली आणि जर्मनी या देशांचा समावेश आहे.

## अर्थसंकल्पावर मनोज जरांगे यांची प्रतिक्रिया, मराठा आरक्षणाचा उल्लेख करत म्हणाले...

**■मुंबई। यश सावंत,**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आगामी आर्थिक वर्षाचा (२०२४-२५) अर्थसंकल्प आज (१ फेब्रुवारी) संसदेत सादर केला. लोकसभा निवडणुकीपूर्वीचा हा अंतरिम अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पातून कर रचनेत कोणतेही बदल केले गेले नाहीत. निर्मला सीतारमण यांनी २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत.

अर्थमंत्री म्हणाल्या, देशात कर भरणाऱ्यांची संख्या २.४ पटीने वाढली आहे, तसेच २०१४ पासून प्रत्यक्ष कर संकलनात तिपटीने वाढ झाली आहे. २०२४-२५ मध्ये २६.०२ लाख कोटी रुपये इतकी करप्राप्ती अपेक्षित आहे. दुसऱ्या बाजूला, ३१ मार्च २०२५ पर्यंत स्टार्ट-अप्सना दिलेली कर सवलत वाढवण्यात आली आहे. दरम्यान, अर्थसंकल्पावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. अर्थतज्ज्ञ, व्यावसायिक, विरोधी पक्ष यावर आपापली मतं मांडत आहेत. अशातच जालना येथे प्रसारमाध्यमांशी बोलणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना काही पत्रकारांनी अर्थसंकल्पावर त्यांची प्रतिक्रिया मागितली.

त्यावर मनोज जरांगे पाटील म्हणाले, मला अर्थसंकल्पातलं काही कळत नाही. काही लोक बजेट कोलमडलंय किंवा बजेटमधून काही मिळालं नाही असं म्हणतायत त्यांना किंवा अर्थतज्ज्ञांकडे तुम्ही प्रतिक्रिया मागितली पाहिजे.

## "राहुल नार्वेकर म्हणजे कोकणच्या मातीला लागलेला कलंक", उद्धव ठाकरे यांची बोचरी टीका

**■मुंबई। नितीन देवळेकर,**

शिवरायांच्या भगव्याला ज्यांनी कलंक लावला आहे आणि ज्यांना वाटतंय की त्यांचं फडकं म्हणजे राष्ट्रध्वज तसं नाही. आम्ही आमच्या शिवरायांचा भगवा लाल किल्ल्यावर फडकवणार आहोत ही आमची प्रतिज्ञा आहे असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर टीका केली. तसंच राहुल नार्वेकर यांच्यावरही टीका केली. उद्धव ठाकरे यांनी अलिबागच्या चौलमध्ये सभा घेतली त्यावेळी त्यांनी भाजापवर आणि राहुल नार्वेकर यांच्यावर टीका केली. राहुल नार्वेकर म्हणजे कोकणच्या मातीला लागलेला कलंक आहे असंही त्यांनी म्हटलं आहे.

**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

अलिबाग आणि रायगड म्हणजे दोन मतदारसंघ एक लोकसभेचा आणि विधानसभेचा. तुम्हाला दोनदा गद्दारांना गाडायचं आहे. इथे डबल गद्दारी झाली आहे. नुसतीच गद्दारी नाही. १५ दिवसांनी एका लवादाने म्हणजेच लबाडाने एक निर्णय दिलाय. ते तुमचे इथलेच कुठले तरी आहेत मला वाटतं रेवसचे वगैरे. हा या मातीला लागलेला कलंक आहे. मी कलंक शब्द मागे एकदा बोललो तर खूप झोंबला होता. कुणाला बोललो होतो तुम्हाला माहीत आहे. त्यांना खूप झोंबला होता शब्द. आता त्यांना बोलत नाहीये, आत्ता जे बोललो ते दहाव्या परिशिष्टाची चिरफाड करुन जो उरफाटा आणि विक्षिप्त निर्णय दिला त्याच्याबद्दल बोलतो आहे.

## राहूरी वकील दांपत्य हत्येच्या निषेधार्थ भिवंडीत वकिलांचे आंदोलन

**■भिवंडी। भावना जैन,**

अहमदनगर जिल्ह्यातील राहूर येथे राजाराम आढाव आणि मनिषा आढाव, या वकील दांपत्याची खंडणीसाठी हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करत, तसेच या घटनेचा निषेध करण्यासाठी भिवंडी वकील संघटनेच्या वतीने निषेध मोचार्चे आयोजन करण्यात आले होते.

हा मोर्चा अध्यक्ष ॲड. दिनेश्वर पाटील यांच्या नेतृत्वाखाली भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर काढण्यात आला होता.

या आंदोलनात शेकडो वकील सहभागी झाले होते. या निषेधार्थ गुरुवारी दुपार पर्यंत भिवंडी न्यायालयातील कामकाज न करण्याचा निर्णय वकिलांनी घेतला होता. तसेच वकील संरक्षण कायदा लागू करण्याची मागणी देखील यावेळी वकील संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

## शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबईत ६ फेब्रुवारी पर्यंत जवाबंदी

**■मुंबई। विशाल कारंडे,**

मुंबईत ६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत जमावबंदीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील अधिकारानुसार पोलीस उपआयुक्त (अभियान) यांनी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये ६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत जमावबंदी आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करणे, मिरवणूक काढणे, जमाव करुन ध्वनिवर्धकाचा, सांगितीय बँड, फटाके फोडणे यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. विवाह समारंभ आणि विवाह प्रथेशी संबंधित अन्य समारंभ, अंत्यविधी कार्यक्रम, कंपन्या, सहकारी संस्था आणि अन्य संस्था व संघटनांच्या कायदेशीर बैठका, क्लबमध्ये होणारे कार्यक्रम, सामाजिक मेळावे, सहकारी संस्था तसेच अन्य संस्थांच्या नियमित कामकाजाचा भाग म्हणून होणारे कार्यक्रम यांना या बंदी आदेशातून वगळण्यात आले आहे. चित्रपटगृहे, नाट्यगृहे तसेच सार्वजनिक मनोरंजनाची अन्य ठिकाणे, न्यायालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच अन्य शैक्षणिक संस्था, कंपन्या, कारखाने, दुकाने तसेच अन्य आस्थापनांमध्ये नियमित व्यापार, व्यवसाय या कारणांनी होणाऱ्या जमावास यातून वगळण्यात आले आहे. तसेच जमाव करण्यात तसेच शांततापूर्ण मागार्ने मोर्चास पोलीसांनी परवानगी दिलेली असल्यास त्यासही या जमावबंदीतून वगळण्यात आले आहे, असे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांनी आदेशान्वये कळविले आहे.

## शरीरात लपवले होते तब्बल दीड किलो सोने- मुंबई विमानतळावर तिघांना अटक

**■ मुंबई। विशाल पाटील,**

बँकॉक येथून मुंबईत आलेल्या दोन प्रवाशांनी आपल्या शरीरामध्ये तब्बल दीड किलो सोने लपवत त्याची तस्करी करण्याच्या प्रयत्नांचा सीमा शुल्क विभागाने भांडाफोड करत त्यांना अटक केली आहे.

त्यांच्याकडे सापडलेल्या सोन्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ८७ लाख रुपये आहे. प्राप्त माहितीनुसार, बँकॉक येथून मुंबईत सोन्याची तस्करी होत असल्याची माहिती मुंबई विमानतळावरील सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार अधिकाऱ्यांनी सापळा रचला होता. हुसेन भाटिया आणि बुराहुद्दीन कोटवाला या दोन व्यक्ती या विमानातून उतरल्यानंतर त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्यांना बाजूला घेत त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्या सामानात सोने आढळून आले नाही. मात्र, चौकशीअंती त्यांनी गुदद्वाराद्वारे शरीरात सोने लपविले असल्याची कबुली अधिकाऱ्यांना दिली.

## राज्यातील निवासी डॉक्टरांचा ७ फेब्रुवारीपासून राज्यव्यापी संपाचा इशारा

**■ अशा आहेत मागण्या**

- वरिष्ठ निवासी डॉक्टरांसाठी वसतीगृहाची सुविधा
- विद्यावेतनाची रक्कम नियमित करणे, प्रलंबित रक्कम अदा करणे
- विद्यावेदनामध्ये वाढ करणे

**■मुंबई। दिगंबर जाधव,**

मानधनवाढ, प्रलंबित भत्ते, वसतीगृहांची स्थिती याबाबत सातत्याने पाठपुरावा करूनही सरकारकडून मागण्यांची पूर्तता होत नसल्याने निवासी डॉक्टरांची केंद्रीय संघटना असलेल्या 'मार्ड'ने ७ फेब्रुवारीपासून बेमुदत संप पुकारण्यात निर्णय घेतला आहे. या संपामध्ये राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालयांमधील निवासी डॉक्टर सहभागी होणार आहेत. सरकारचा निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे असलेला दृष्टीकोन अत्यंत उदासीन असून डॉक्टरांच्या मागण्यांची गांभीयार्ने दखल घेतली जात नाही, अशी खंत संघटनेने व्यक्त केली आहे. परराज्यातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयामधील वसतीगृहांमध्ये जागा कमी पडत आहे.

विद्यार्थ्यांची संख्या वाढली, पण निवासाच्या सुविधेत वाढ झालेली नाही. त्यामुळे वसतीगृहांची संख्या वाढविण्याची मागणी मार्डकडून वारंवार करण्यात येत आहे. मात्र सरकार केवळ आश्वासन देण्यापलिकडे कोणतीच ठोस उपाययोजना करीत नाही. विद्यावेतनही वेळेवर मिळत नाही.

## 'शेतमालाला हमीभाव मिळत नाही', सरकार विरोधात ठाण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे निदर्शने

**■ठाणे। अनिकेत भंकाळ,**

: सध्या महागाईचा आगडोंब उसळला असताना ही शेतमालाला हमीभाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. तरूण बेरोजगार आहेत, तर महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढीस लागले आहे. त्यावर तोडगा काढण्याऐवजी सरकार भावनिक खेळ खेळत असल्याचा आरोप करीत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी आज जोरदार निदर्शने केली. येथील शासकीय विश्रामगृहाजवळ या कार्यकर्त्यांनी आज महागाई व बेरोजगारी विरोधात निदर्शने करून प्रशासनाचे लक्ष वेधले. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली या कार्यकर्त्यांनी ही निदर्शन केली. जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. एखाद्या राज्यात निवडणुका आल्यास इंधनाच्या दरात दोन रुपए कपात करून नंतर पाच रुपए वाढविले जात आहेत. दोन कोटी रोजगाराचे आश्वासन देऊनही तरूणांच्या हाताला रोजगार देण्यात केंद्र सरकार अपयशी ठरल्याचा आरोपही या आंदोलनकर्त्यांनी आज करून त्याच्या निषेधार्थ आंदोलन छेडले. यावेळी ठाणे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, महिलाध्यक्षा सुजाता घाग, महिला कार्याध्यक्षा सुरेखा पाटील, युवक अध्यक्ष विक्रम खामकर आदी पदाधिकारी व कर्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळेस कार्यकर्त्याकडून केंद्र आणि राज्य सरकारचा धिक्कार करीत बस हुई महँगाई की मार, नहीं चाहिये मोदी सरकार; सरकार करतंय अंगणवाडी सेविकांचा छळ, यावेळी नाही मिळणार राज्य-केंद्र सरकारला बळ; उच्च शिक्षण घेऊन पकोडे तळायचे? यावेळी जुमलेबाजांना खाली खेचायचे; बळीराजा घेतोय फाशी, सरकार खातंय तुपाशी; पेट्रोल-डिझेल झाले शंभरीपार, सरकारला करू या कायमचे हद्दपार असे घोषणाचे फलक कार्यकर्त्यांनी हातात हे आंदोलन आज छेडले.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

# आली घटिका समीप

अंतरिम अर्थसंकल्प सादर करतानाचे भाषण म्हणजे लक्ष्यित समूह डोळ्यासमोर ठेवून केलेली लोकसभा निवडणुकीची तयारीच म्हटली पाहिजे. अनेक प्रकारचे सोहळे साजरे करण्याची भारतीयांची आवड सर्वज्ञात आहे. त्या आवडीला कार्यक्रम व्यवस्थापनाचा अर्थात इव्हेंट मॅनेजमेंटचा अद्ययावत स्पर्श दिला गेला की, या सोहळ्यांचे महत्त्व कमालीचे वाढते. ते ओळखण्यात मोदी सरकार किती माहीर आहे, हे आजवर अनेक उदाहरणांतून दिसले आहे. या सोहळ्यगर्दीत अर्थसंकल्प सादरीकरणासारख्या गंभीर विषयाचाही समावेश होताना दिसतो.

अर्थसंकल्पाच्या पूर्वतयारीपासून ते प्रतिक्रियांपर्यंतचा साग्रसंगीत उपचार, या सगळ्याभोवती मीडियाने धरलेला फेर, थेट प्रक्षेपण, चर्चा या सगळ्याचा गेल्या काही वर्षांत जणू पॅटर्नबनला आहे. विशेष म्हणजे लेखानुदानाचे सादरीकरणही त्याळा अपवाद ठरलेले नाही. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी संसदेत वित्तविधेयक सादर करण्याच्या निमित्ताने केलेले भाषण म्हणजे लक्ष्यित समूह (टार्गेट ऑडियन्स) डोळ्यासमोर ठेवून केलेली लोकसभा निवडणुकीची तयारीच म्हटली पाहिजे. निवडणुकीची घटिका समीप आल्याचे नाद-निनाद त्यांच्या भाषणातून जाणवले.

जुलैमध्ये आम्ही पूर्ण अर्थसंकल्प सादर करू, हे त्यांचे विधान आणि २०१४ पूर्वीच्या अर्थसंकल्प व्यवस्थापनातील गोंधळाची श्वेतपत्रिका काढण्याची घोषणा यातील राजकारण कोणालाही कळेल. निवडणूक जवळ आलेली असताना महत्त्वाच्या घोषणा आणि धोरणात्मक निवेदने केली जाऊ नयेत, असा संकेत आहे. तो सरकारने बव्हंशी पाळला आणि सवलतींच्या खैरातीचा मोह टाळला, हे मान्य करायला हवे.

मात्र भाषणाचा एकूण आशय मोदी सरकारच्या गेल्या पाचच नव्हे, तर दहा वर्षांतील कामगिरीचे महत्त्व ठसविण्याचा होता. ते करताना उद्धृत केलेल्या बऱ्याचशा संख्यांचा उल्लेख यापूर्वीही वेगवेगळ्या निमित्ताने झाला आहे. परंतु आकड्यांच्या आकर्षक महिरपीतही वास्तव लपत नाही. उदाहरणार्थ, गेल्या दहा वर्षांत २५ कोटी लोकांना गरीबीच्या खाईतून बाहेर काढण्यात यश आले, असे अर्थमंत्र्यांनी नमूद केले. ही अर्थातच समाधानाची बाब. परंतु या घटकाच्या सक्षमीकरणाचे नेमके स्वरूप काय आहे, याच्या तपशीलात त्या शिरत नाहीत. यापैकी बहुतेक जण कोविडकाळातील ठाणबंदीच्या परिणामी पुन्हा गरीबीत ढकलले गेले होते. त्यातून ते सावरले असले तरी त्यांचे ठोस, कायमस्वरूपी सक्षमीकरण हा खरा मुद्दा आहे. ह्यमुद्राह्न योजनेंतर्गत वाटप झालेल्या कर्जांचा आकडा सांगितला गेला; परंतु कर्जवसुलीच्या प्रमाणाविषयी मौन पाळले गेले.

वित्तीय तूट जीडीपीच्या साडेचार टक्क्यांवर आणणे हे मूळ उद्दिष्ट २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात निर्मला सीतारामन यांनी नमूद केले होते. परंतु २०२४-२५ या आर्थिक वर्षांत वित्तीय तुटीचे जीडीपीशी असलेले प्रमाण ५.१ टक्के राहणार असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्याच भाषणातील उल्लेखानुसार १४ लाख तेरा हजार कोटीची कर्जउचल अंदाजित आहे.

सरकारने दिलेला अंदाजित वित्तीय तुटीचा आकडा आहे सोळा लाख ८५ हजार कोटी. महसुली तुटीचे वित्तीय तुटीशी असलेले ३९ टक्के प्रमाण लक्षात घेता उचलेल्या कर्जापैकी तेवढी रक्कम अनुत्पादक कामांसाठी वापरली जाणार हे स्पष्ट होते. वित्तीय शिस्तीबाबत काटेकोर आहोत, असा दावा अर्थमंत्री करतात, पण त्याच्याशी हे वास्तव मेळ खात नाही.

अमृतकाल हा कर्तव्यकाल आहे, हे त्यांचे विधान मात्र वास्तवाला धरून आहे आणि ते लोकांनी लक्षात घ्यायला हवे. अनुदाने, सवलती यांचा वर्षाव करून सातत्याने मायबाप सरकारची संकल्पना अधिकाधिक घट्ट करीत जाणे हे राजकीयदृष्ट्या सोईचे असेल तरी अर्थव्यवस्थेला उपकारक ठरत नाही. त्यादृष्टीने संपत्तीनिर्मितीच्या वाटा शोधणे आणि त्यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे ठरते.

सरकार त्याहीदृष्टीने विचार करीत आहे, याचा सुखद प्रत्यय या अंतरिक अर्थसंकल्पातील काही मुद्यांवरून नक्कीच येतो. विशेषतः पर्यटनात वाढ करण्यासाठी उचललेली पावले महत्त्वाची आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोदी सरकार सातत्याने वाढीव तरतूद करत आला आहे. हा अंतरिम अर्थसंकल्पही त्याला अपवाद नाही. त्यातून रोजगारसंधी वाढतील, अशी अपेक्षा आहे. पण रोजगारनिर्मितीचे आव्हान इतके मोठे आहे आणि सर्वस्तरीय आहे, की एखाद-दुसऱ्या क्षेत्रात प्रयत्न करून त्याला तोंड देता येणार नाही. मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय यांना डोळ्यासमोर ठेवून काही योजनांचे सूतोवाच करण्यात आले आहे.

# SUPERFOOD KOMBUCHA: KNOW THESE 5 BENEFITS OF THIS TEA

Kombucha, a bubbly fermented tea brimming with probiotics and flavour, has taken the health world by storm. But beyond its trendy appeal, this ancient beverage boasts a range of potential benefits that go beyond just being a delicious alternative to sugary sodas. So, ditch the Fizzy Fruity and explore the five refreshing reasons to raise a glass of kombucha tea.

**Probiotic richness for digestive harmony:** At the core of Kombucha's health benefits lies its impressive probiotic profile. The fermentation process results in the formation of beneficial bacteria, crucial for fostering a diverse and balanced gut microbiome. These probiotics, including strains like Lactobacillus and Bifidobacterium, contribute to enhanced digestion, absorption of nutrients, and the maintenance of gut health.

**Detoxification through organic acids:** Kombucha's fermentation produces organic acids, notably gluconic acid and acetic acid, which play a pivotal role in detoxification. These acids aid the body in expelling toxins and supporting the liver's detoxifying functions. Regular consumption of Kombucha is thought to contribute to a more efficient removal of harmful substances, fostering overall metabolic well-being.

**Boosted immunity:** The symbiotic relationship between the gut and the immune system is well-established, and Kombucha actively contributes to this connection. By fostering a healthy gut microbiome, the beverage indirectly supports immune function. The probiotics present in Kombucha may help regulate the immune response, promoting resilience against infections and illnesses.

**Potential influence on mental clarity:** Beyond its physical benefits, Kombucha is suggested to have positive effects on mental health. The intricate interplay between the gut and the brain is a burgeoning area of research, and Kombucha's probiotics and antioxidants may contribute to this dynamic. Some proponents report improved mental clarity and reduced stress levels with regular consumption, though more research is needed in this area.

**Nutrient-rich elixir:** Kombucha is not only a refreshing beverage but also a nutrient-rich elixir. Laden with essential vitamins such as B-vitamins and vitamin C, along with polyphenols, provides a diverse array of nutrients. These components collectively contribute to various bodily functions, from energy metabolism to antioxidant defence, enhancing overall nutritional well-being.

# शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉल दूर करण्यासाठी 'या' फळांचं करा सेवन, लगेच दिसेल फरक



वेगवेगळी शरीरात बॅड कोलेस्ट्रॉल वाढलं की, अनेक समस्या होऊ लागतात. अशात हाय कोलेस्ट्रॉल कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी तुम्ही काही फळांचं सेवन करू शकता ज्याने तुम्हाला कोलेस्ट्रॉलची समस्या दूर करण्यास मदत मिळेल. कोलेस्ट्रॉल वाढण्याची वेगवेगळी कारणे असतात. ज्यात अनहेल्दी डाएट, प्रोसेस्ड फूड्स आणि बाहेरचे तळलेले पदार्थ, शुगर असलेले पदार्थ आणि लो फायबर फूड्स हे यांचा समावेश असतो. त्यासोबतच स्मोकिंग, अल्कोहोलचं जास्त सेवन, एक्सरसाइजची कमतरता, हाय ब्लड प्रेशर किंवा डायबिटीसमुळेही ही समस्या होऊ शकते. अशात हाय कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी काही फळांचं सेवन फायदेशीर ठरतं. ज्यातून तुम्हाला व्हिटॅमिन्स, मिनरल आणि ॲंटी-ऑक्सिडेंट्स मिळतील.

**आंबट फळं –** आंबट फळांमध्ये व्हिटॅमिन सी आणि फायबर भरपूर प्रमाणात असतं. यात ॲंटी-ऑक्सिडेंटही असतात जे नुकसानकारक छऊछ कोलेस्ट्रॉल म्हणजे बॅड कोलेस्ट्रॉलला कमी करतात आणि हेल्दी कोलेस्ट्रॉल वाढवण्यास मदत करतात. तुम्हाला माहीत असलं पाहिजे की, व्हिटॅमिन सी हार्ट डिजीज आणि ब्लड प्रेशरचा धोका कमी करतात. अशात ही फळं आवर्जून खावीत.

**ॲवोकाडो –** ॲवोकाडोमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट असतं. जे हार्टसाठी फायदेशीर असतं. ॲवोकाडो हाय डेंसिटी असलेल्या लिपोप्रोटीन आणि लो डेंसिटी असलेल्या लिपोप्रोटीन कोलेस्ट्रॉल दोन्हीची तुलना संतुलित करतं.

**जांभळं –** जांभळांमध्ये फायटोन्यूट्रिएंट्स असतात जे तुमच्या हार्टसाठी फायदेशीर असतात. तसेच कोलेस्ट्रॉल कंट्रोल करण्यास मदत करतात. जांभळाचा कोणत्याही प्रकारे आहारात समावेश केला तर तुम्ही तुमच्या शरीरात हेल्दी कोलेस्ट्रॉल वाढवण्यास मदत करू शकता.

**केळी –** केळीमध्ये फायबर, व्हिटॅमिन आणि अनेक प्रकारचे व्हिटॅमिन्स सोबतच सुक्रोज, फ्रक्टोज आणि ग्लूकोजसारखं शुगर असतं. केळी पोटॅशिअम आणि फायबरचा चांगला स्त्रोत आहे. ज्याने कोलेस्ट्रॉल आणि ब्लड प्रेशर कमी करण्यास मदत मिळते.

**फायबर फूड –** फायबर असलेले फूड्स किंवा फळं हाय कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी करण्यास मदत करतात. फळांमध्ये फायबरचं प्रमाण जास्त असतं, ज्याला मेडिकल भाषेत पेक्टिन म्हटलं जातं. याने कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत मिळते. फायबर भरपूर असलेल्या सफरचंद आणि नाशपाती सारख्या फळांचं नियमितपणे सेवन करा.

# घोड्यावरुन आली अजिंक्यची स्वारी ! शिवानी सुर्वेच्या लग्नात 'झिम्मा 2'च्या कलाकारांची हजेरी

मराठी अभिनेत्री शिवानी सुर्वे गुरुवारी विवाहबद्ध झाली आहे. बॉयफ्रेंड आणि अभिनेता अजिंक्य ननावरेसह तिने लग्न केले. कालच या सेलिब्रिटी कपलचा थाटात साखरपुडा पार पडला. तर गुरुवारी सकाळीच हळद समारंभ झाला आणि दुपारी ही जोडी लग्नबंधनात अडकली. ठाण्यातील येऊरमधील एका रिसॉर्टमध्ये हा विवाहसोहळा आयोजित करण्यात आला होता. अभिनेत्री शिवानीचे लग्नात दोन लूक पाहायला मिळाले. आधी तिने विधींसाठी पारंपरिक लाल-पिवळ्या रंगाची साडी नेसली. तर सातफेरे घेताना तिने गुलाबी रंगाचा लेहेंगा घातला ज्यामध्ये ती कमालीची सुंदर दिसत आहे. तर अजिंक्यनेही पांढऱ्या आणि गुलाबी थीमला पसंती दिली. दोघांनी एकमेकांच्या गळ्यात हार घातला तो क्षणही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. त्यांच्या लग्नाची मराठी सिनेसृष्टीत जोरदार चर्चा रंगली आहे. त्यांचे फोटो, व्हिडिओही व्हायरल होत आहेत. शिवानीचा 'झिम्मा 2' सिनेमा सुपरहिट झाला. या सिनेमाच्या स्टारकास्टनेही तिच्या लग्नात आवर्जुन हजेरी लावली. ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी, दिग्दर्शक हेमंत ढोमे, अभिनेत्री सायली संजीव या विवाहस्थळी दिसल्या.

# अभिजीत आणि सुखदा खांडकेकरच्या लग्नाला ११ वर्ष पूर्ण

अभिनेता अभिजित खांडकेकर आणि सुखदा खांडकेकर यांची जोडी मराठी कलाविश्वातील लोकप्रिय जोड्यापैकी एक आहे. अभिजित आणि सुखदा सोशल मीडियावर सक्रिय असून ते या माध्यमातून फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असतात. दरम्यान गुरुवारी त्यांच्या लग्नाला ११ वर्षे पूर्ण झाली असून त्या निमित्ताने अभिजीत खांडकेकरने सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केली आहे. अभिजीत खांडकेकरने सुखदासोबतचे फोटो शेअर करत लिहिले की, एकत्र प्रवास करण्याच्या या प्रवासात आनंदाची ११ वर्ष! त्याच्या या पोस्टवर शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे.

# खंबाटकी घाटात कंटेनर अडकल्याने १ तास अडकून पडले आदेश बांदेकर

महाराष्ट्राचे लाडके भाऊजी आदेश बांदेकर मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता आहेत. 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमातून प्रेक्षकांच्या घराघरातच नाही तर मनातही त्यांनी स्थान मिळवलं आहे. गेली कित्येक वर्ष ते प्रेक्षकांचं अविरत मनोरंजन करत आहेत.

आदेश बांदेकरांचा चाहता वर्गही प्रचंड मोठा आहे. ते सोशल मीडियावरुन चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. शूटिंगदरम्यानचेही अनेक व्हिडिओ बांदेकर शेअर करताना दिसतात.

सध्या आदेश बांदेकरांच्या एका व्हिडिओने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. वाई-मुंबई प्रवासादरम्यान आदेश बांदेकरांना तब्बल एक तास खंबाटकी घाटात अडकून राहावं लागलं. बोगद्यात एक कंटेनर अडकल्याने प्रवाशांचा खोळंबा झाला होता. याचा व्हिडिओ आदेश बांदेकरांनी शेअर केला आहे. ₹खंबाटकी घाटातल्या बोगद्यात हा भला मोठा कंटेनर अडकून पडला आहे. त्यामुळे बोगद्यात ट्राफिक झालंय आणि त्यामुळे प्रवाशांना त्रास होतोय. त्या चालकाने कोणताही विचार न करता बोगद्यापेक्षा मोठ्या आकाराचा कंटेनर बोगद्यात घेऊन गेला. त्यामुळे नाहक अडचणींचा सामोरं जावं लागलं.

## HEALTH AND SPORTS

### "I'M TRYING TO LEARN FROM KOHLI'S BATTING", SAYS RAJAT PATIDAR

**NEW DELHI:** Rajat Patidar who is expected to make his test debut in the second test match against England says he prides himself in being a good learner and has been trying to upgrade his skills by observing the RCB teammate Virat Kohli's batting. The injuries blow for KL Rahul and Ravindra Jadeja provided an opportunity to Madhya Prasdesh's Rajat Patidar. He scored tons of runs in domestic cricket for MP. "I always observe his (Kohli) batting from the back of the nets, especially his footwork and body movement while batting. I try to learn and add these things into my batting" Rajat Patidar told BCCI.TV referring to the time spent with Kohli in their IPL team Royal Challengers Bangalore. Star Indian batsman Virat Kohli opted out of the first two test matches against England due to personal reasons. "It is not easy but I am relentlessly after it," Patidar said about his pursuit of excellence. The 30-year-old prolific middle-order batsman also stated that sharing the dressing room with Rahul Dravid and Rohit Sharma has also benefitted him. "I have played with many Indian players in the domestic circuit. I have been interacting with Rahul sir since the last two series. "I had not spoken a lot with Rohit bhai but I got to speak with him on this tour about batting. He shared his experiences in the nets, all this has increased my confidence," Patidar said. The late bloomer said he won't curb his attacking style if he gets to make his Test debut on Friday. "I have an aggressive batting style and I started playing shots since the beginning of my domestic career. It is in my habit and it's all about preparation. I have prepared myself that way, so it has become a habit now," he said.

### KS BHARAT'S SUBTLE REMINDER TO ENGLAND AS RAHUL DRAVID, ROHIT SHARMA URGE INDIA 'NOT TO PANIC' IN 2ND TEST

**NEW DELHI :** Before England get too far ahead of themselves, wicketkeeper KS Bharat has sent a timely reminder to Ben Stokes about India's ability to bounce back after an early defeat. England beat India by 28 runs on Day 4 in Hyderabad to pick up a 1-0 lead but as recent history has proven, losing the first Test of a series has brought the best out of the Indian team. Be in the 2020/21 Border-Gavaskar Trophy or the 2021 series against England, India, from being 0-1 down, went on to win the series. Bharat, who addressed India's press conference on the eve of the 2nd Test in Visakhapatnam starting Friday, was crystal clear in his thoughts, which brilliantly summed up the adage 'don't count your chicken before they hatch' "We are good at bouncing back after losing the first Test, so as a team we're looking to do well. England won in Hyderabad. Ollie Pope played well, and some of the sweeps and reverse sweeps their guys played were impressive. Credit where it's due. They deserved to win. But like I said, we have bounced back previously as well so yeah, looking forward to this next challenge," Bharat said. Bharat understands that India's Playing XI isn't the most experienced. With Virat Kohli already out of the first two Tests, injuries to KL Rahul and Ravindra Jadeja have further dented the team combination. To fill the void, Rajat Patidar is poised to make his Test debut for India, with expectations that Shubman Gill and Shreyas will deliver. Having said that, a five-match Test series means there is a long way to go, so although the defeat last week has pushed India down to No. 5 on the WTC table, it's too early to jump to any conclusions.

### WHY ROHIT SHARMA COULD BE INDIA'S SAVIOUR AGAINST ENGLAND IN VIRAT KOHLI'S ABSENCE AT VISAKHAPATNAM

**NEW DELHI :** India are trailing 0-1. It does not happen often but it's not a rarity either. Previously too, India have lost the first Test of a series, but only to come back stronger and turn the tables. And if you are looking for some solace in this trivia, here goes another. During England's last tour of India, the home team lost the first Test in Chennai before winning the next three to take the series 3-1. Can history repeat itself? Well, you'd better hope. But India have a problem. KL Rahul and Ravindra Jadeja are out of the Visakhapatnam Test, and so is Virat Kohli, leaving the youngsters with a big void to fill, especially that of the former India captain. He looked like a million bucks in the Test series against South Africa and would have loved to have a go at England had it not been for a last-minute withdrawal on an account of family emergency. And when you have a look at Kohli's record at Vizag, you ought to feel his absence even further. In two Tests at the Dr YS Rajasekhara Reddy Cricket Stadium, Kohli has scored 299 runs at a stunning average of 99.67 with a hundred and a fifty. In fact, in 2016, when Kohli was unstoppable during England's four-Test series in India with 655 runs, he cracked a brilliant 167 and 81 in Visakhapatnam to guide his team to a 246 run victory. Three years later, Kohli was back in Vizag, although this time his returns were underwhelming with scores of 20 and 31 not out.

### DO YOU HAVE AN INNER CRITIC? HERE ARE 5 STEPS TO COMBAT IT

The little voice inside of us can have a huge impact on the way it converses with us. When we are too busy being our critic, we lose out on growing our self-esteem and developing a strong sense of self. The inner critic in us constantly keeps on criticising every move, every action, every response and every thought in a negative way, so much so that it hampers the way we think of ourselves. "Tell me: Are you your own worst critic? So many of us are, which is why knowing how to work with, not against your inner critic is so important. Trying to simply push away the voice of your inner critic is not an effective tactic," wrote Therapist Gianna LaLota. The expert further noted down a five-step process to combat the inner critic in us and explore ways to invest in our own mental and emotional growth. Notice it: The first step is to notice the things that the inner critic says about us. The words that we say to ourselves also reflect our deep fears and our traumatic experiences that we have had with ourselves over the years. Name it: The next step is to segregate the inner criticism from actual thoughts. We should name it as criticism coming from ourselves and know that sometimes it may not be the truth. When we name it, we start the process of avoiding it when it gets too negative for ourselves. Thank it: When we come from traumatic experiences of failure, judgement and rejection, the inner critic in us starts to get more active in order to save us from the same feelings in the future. Hence, it can start to get too negative. We should thank it for looking out for us and trying to save us from those difficult emotions. Challenge it: We should be able to challenge the words that the inner critic tells us to understand if it is the truth or not. In case there is no logic to back it up, we should get over it. Practice self-compassion: Self-compassion is the antidote for inner criticism. Loving ourselves, accepting ourselves the way we are and investing in our happiness can help us to combat the inner critic and become more optimistic in life.

### PRANAYAM : REASONS TO PRACTISE THIS YOGIC BREATHING AND KEEP RESPIRATORY WOES AT BAY

Pranayama encompasses a range of approaches to help individuals control their breath and enhance their overall well-being. The practice is often paired with meditation and different yoga postures. Its fundamental principle is that the breath acts as a bridge between the mind and body, harmonising the two. By controlling their breath, individuals can accomplish a more profound sense of calm and balance in their lives. Mental health benefits of Pranayama : Numerous scientific researches across the globe have validated the significant effect of Pranayama on mental health, including :

- Lowered stress: By allowing individuals to focus on their breathing, Pranayama helps in alleviating stress and anxiety. With this, one can nurture a sense of inner calmness and develop resilience to deal with life's challenges.
- Elevated mood: Pranayama is also highly recognised for its ability to uplift mood and mitigate the symptoms of depression. It fosters an optimistic environment, replacing negative beliefs and emotions with positivity and happiness, improving overall mental well-being.
- Improved focus: Pranayama can be a vital tool for improving concentration and focus in today's world of endless distractions. Training the mind to focus on the present moment, it allows practitioners to perform their daily tasks with improved efficiency and precision. Thus, by making it a regular part of their routine, individuals can achieve higher productivity in all areas of their lives.
- Enhanced self-awareness: Regularly practising Pranayama can also help in developing an increased sense of self-awareness. This heightened self-awareness enables us to comprehend our thoughts and emotions better, leading to personal growth and self-improvement.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118
● Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Adviser: Adv. Aniket Ghanshyam Bhankal, L.L.B., (ठाणे न्याय कक्षेत)

# पनवेल औद्योगिक वसाहतीचा वनवास संपणार; एमआयडीसीने पायाभूत सुविधांच्या प्रस्तावित कामांना मंजूरी दिली

**■पनवेल। प्रतिनिधी,**

पनवेल औद्योगिक वसाहतीमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने मागील अनेक वर्षांपासून ही वसाहत उद्योग क्षेत्रापासून दुर्लक्षित राहीली. अक्षरशा वनवासासारख्या वाईट अवस्थेमध्ये येथील ९२ उद्योग टिकून राहीले. मागील तीन वर्षांपासून येथील उद्योजकांच्या संघटनेने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्यातील इतर सहकारी औद्योगिक वसाहतींच्या पायाभूत सुविधा पुरविण्याचे एमआयडीसीने निश्चित केले. पनवेल औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते डांबरीकरण, पाण्यासाठी जलकुंभ, मलनिसारणासाठी उदंचन केंद्र आणि पावसाळी गटार यांसारख्या प्रस्तावित कामांना लागणारा २२ कोटी ३१ लाख रुपयांचा निधीला एमआयडीसीने मंजूरी दिली आहे.

१९६३ साली पनवेल इंडस्ट्रीअल इस्टेट या नावाने पनवेलची औद्योगिक वसाहतीची स्थापना झाली असली तरी १९६८ सालापासून येथील ३२ एकर जागेवर उद्योग स्थापन झाले. या औद्योगिक वसाहतीच्या उद्योजकांच्या संघटनेचे अद्यक्ष विजय लोखंडे व त्यांच्या सहका-यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य सरकारच्या एमआयडीसी विभागातील उच्च पदस्थ अधिका-यांना औद्योगिक विभागाची खरी व्यथा समजल्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सूकाणू समिती स्थापन करण्यात आली. या समितीने पनवेल सह राज्यातील अजून ९ अशा १० औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधा देण्यासाठी प्रस्ताव मागविले. पायाभूत सुविधांमधील कामांच्या निधीपैकी २५ टक्के निधी उद्योजकांनी देण्याची अट असल्याने पनवेल औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांनी ५ कोटी ५८ लाख रुपये एमआयडीसीकडे वर्ग केले आहेत. लवकरच निविदा प्रक्रीया पार पडल्यानंतर प्रत्यक्षात कामाला सूरुवात होणार आहे. मागील अनेक वर्षांपासून आहे त्याच परिस्थितीमध्ये आमचे उद्योग टिकले आहेत.

# सायबर गुन्हेगारीचे आव्हान, गुन्हे उघड करण्याचे प्रमाण ६७ वरून ७३ टक्क्यांवर; नव्या चार पोलीस ठाण्यांची निर्मिती

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

देशात वेगवान वाढ होणारे आणि तिसऱ्या क्रमांकाचे स्वच्छ शहर म्हणून ओळख असलेले नवी मुंबई शहर आता सायबर गुन्हेगारी आणि अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत चालले असून याला पायबंद घालण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

एकीकडे हे आव्हान असले तरी दुसरीकडे मात्र महिला अत्याचार, विनयभंग आणि वाहनचोरीच्या प्रमाणात घट झालेली आहे. याशिवाय दोष सिद्धी प्रमाणात ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच गुन्हे उकल होण्याचे प्रमाण २०२२ मध्ये ६७ टक्के होते. यंदा हे प्रमाण थेट ७३ टक्क्यांपर्यंत गेले आहे. पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी ही माहिती दिली.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात २०२२ मध्ये ६ हजार ४४३ एकूण गुन्ह्यांची नोंद झाली. त्यापैकी ४ हजार २९७ गुन्ह्यांची उकल झाली आहे. तर २०२३ मध्ये ६ हजार ६५६ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी ४ हजार ८१२ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२२ सालाच्या तुलनेत २०२३ सालात गुन्ह्यांत वाढ झाली असली तर गुन्हे उकल होण्याचे प्रमाणही ६ टक्क्यांनी वाढले आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्था उदयास येत आहे. या ठिकाणी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लक्ष्य करीत अंमली पदार्थ विक्रेत्यांनी जाळे विणले असल्याचे अनेक गुन्हे तपासात समोर आले आहे. त्यामुळेच नवी मुंबई पोलिसांनी ह्यनशा मुक्त नवी मुंबईह्नअभियान सुरू केले असून त्याअंतर्गत मोठ्या प्रमाणात कारवाया करण्यात येत आहेत.

अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर २०२३ ऑगस्टमध्ये नेरुळयेथे सायबर पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. सायबर गुन्ह्यांत आर्थिक फसवणूक उग्र रूप धारण करीत आहे. २०२२ मध्ये २०७ गुन्ह्यांची नोंद झाली होती. त्यापैकी केवळ ७२ गुन्हे उकल करण्यात यश आले तर २०२३ मध्ये त्यात वाढ होत एकूण ४०३ गुन्ह्यांची नोंद झाली. यात ७६ गुन्हे उकल करण्यात आली आहे. यातील ३०२ गुन्ह्यांत ४७ कोटी ८५ लाखांची फसवणूक झाली आहे. सायबर पोलीस ठाण्यात आतापर्यंत ३८ गुन्ह्यांची नोंद झाली असून यापैकी १३ गुन्ह्यांची उकल झाली आहे. यात १४ कोटी ४६ लाख ८२ हजार २६४ रुपयांची फसवणूक झाली आहे. गुन्हा नोंद होताच तात्काळ ज्या बँकेत पैसे जमा केले तेथे संपर्क साधून खाते गोठवणे सुरु केल्याने आता पर्यंत ३३ कोटी ७२ लाख ३९ हजार ८८९ एवढी रक्कम गोठवण्यात आली आहे.

राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टल (एन.सी.सी.आर.पी.) मध्ये नवी मुंबईतील ७ हजार ९१ तक्रारींची नोंद झाली आहे. त्यात ६७ कोटी रुपयांची फसणूक झाली असून त्यापैकी केवळ ६.७८ कोटी रक्कम गोठवण्यात आली आहे. एकूण गुन्हे पाहता २०२२ मध्ये दोष सिद्धीचे प्रमाण ३० टक्के होते तर २०२३ मध्ये हेच प्रमाण सहा टक्क्यांनी वाढून ३६ टक्के झाले.

# डोंबिवलीत आयरे येथील बेकायदा इमारत जमीनदोस्त

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

येथील आयरे भागातील सरस्वती शाळे जवळील ६५ महारेरा प्रकरणातील एक बेकायदा इमारत ग प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने जमीनदोस्त केली. कल्याण मधील आय प्रभागा नंतर डोंबिवलीत भुईसपाट करण्यात आलेली अनेक महिन्यांनंतरची ही पहिलीच बेकायदा इमारत आहे. आयरे गावात दिलीप पंढरीनाथ पाटील यांनी पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता पाच माळ्याची इमारत बांधली होती. या इमारती विषयी ग प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त सोनम देशमुख यांच्याकडे तक्रारी आल्या होत्या. ही इमारत गुन्हे दाखल ६५ महारेरा प्रकरणातील होती. तक्रारींच्या अनुषंगाने साहाय्यक आयुक्त देशमुख यांनी दिलीप पाटील या भूमाफियाला कागदपत्रे सादर करण्याच्या नोटिसा दिल्या. त्यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही. ही इमारत अनधिकृत घोषित करून देशमुख यांनी पोलीस बंदोबस्तात इमारत भुईसपाट केली.

डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारतींना महारेरा नोंदणी प्रमाणपत्र घेऊन गुन्हे दाखल होऊन चौकशी सुरू असलेल्या प्रकरणातील ही बेकायदा इमारत होती. या बेकायदा इमारतीच्या ठिकाणी जाण्यासाठी आयरे गाव येथील रेल्वे पुलाचा अडथळा होता. त्यामुळे उंच, अवजड यंत्रणा येथे जाऊ शकली नाही. मग मनुष्यबळाचा वापर करून साहाय्यक आयुक्त देशमुख यांनी १२दिवसांच्या कालावधीत ही इमारत भुईसपाट केली. या कारवाईसाठी अधीक्षक डी. एस. चौरे, रामनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गिते यांनी महत्वाचे

सहकार्य केले. एक पोकलने, दोन जेसीबी या इमारतीच्या तोडकामासाठी तैनात होते.

आयरे भागात एकूण ३५ हून अधिक बेकायदा बांधकामे सुरू आहेत. रस्ते, गटार, विकास आराखड्यातील रस्ते बंद करून ही कामे केली जात आहेत. या बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी तक्रारदार सुदर्शन म्हात्रे यांनी केली आहे. ज्या साहाय्यक आयुक्तांनी यापूर्वी या बेकायदा बांधकामांची पाठराखण केली. त्या सर्व अधिकाऱ्यांच्या या प्रभागातून यापूर्वी तडकाफडकी बदल्या झाल्या आहेत.

# कल्याणमधील भाजपचे माजी नगरसेवक मनोज राय यांच्याविरूद्ध बलात्काराचा गुन्हा

**■कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याण पूर्वेतील कैलासनगर प्रभागाचे (प्रभाग क्रमांक १०३) भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक तथा विकासक मनोज रामशकल राय यांच्या विरूद्ध एका महिलेने बुधवारी बलात्काराचा आणि लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचा गुन्हा कोळसेवाडी पोलीस ठाण्यात दाखल केल्याने खळबळ उडाली आहे. कल्याण पूर्वेतील राय रेसिडेन्सी गृह प्रकल्पाचे मनोज राय हे मुख्य प्रवर्तक आहेत. गृहिणी असलेल्या ४० वर्षाच्या तक्रारदार

पीडित महिलेने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे, सन २०१५ ते मे २०२२ या कालावधीत भाजपचे माजी नगरसेवक मनोज रामशकल राय यांनी आपणास लग्नाचे आमिष दाखवून आपल्या राहत्या घरी येऊन वेळोवेळी आपल्याशी शारीरिक संबंध ठेवले. या शारीरिक संबंधांमुळे मनोज राय यांच्यापासून आपण चारवेळा गर्भवती राहिले. आपल्या इच्छेविरूद्ध हा सगळा प्रकार मनोज राय यांनी केला.

गर्भवती राहिल्यानंतर चार वेळा आरोपी राय यांनी आपणास दमदाटी, शिवीगाळ, मारझोड आणि धमकी देऊन गर्भपात करण्यास जबरदस्तीने भाग पाडले. आपण या प्रकरणी कोठे बोलू नये म्हणून आपणास सतत मारहाण केली जात होती. आता हा सगळा प्रकार असह्य झाल्याने आणि आपणास लग्नाचे आमिष दाखवूनही ते मागील नऊ वर्षाच्या कालावधीत न पाळल्याने आपण ही तक्रार माजी नगरसेवक मनोज राय यांच्या विरूद्ध करत आहोत, असे महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरसाट यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

# डोंबिवलीत रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यावर हल्ल्याचा प्रयत्न; चाकू, दगडाचा वापर

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवली पश्चिमेतील उमेशनगर मध्ये बुधवारी रात्री एका रिक्षा चालकाने रिक्षा चालक मालक संघटनेचे पदाधिकारी शेखर जोशी यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून संतप्त रिक्षा चालकाने हा प्रकार केला आहे. या हल्ल्याचा प्रयत्न करत असताना रिक्षा चालकाने रिक्षेतील चाकू बाहेर काढून रिक्षा संघटना पदाधिकारी जोशी यांना धमकावण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी जोशी यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. एमएच-०५-डीझेड-९३३३ असा रिक्षेचा वाहन क्रमांक आहे.

रिक्षा संघटना पदाधिकारी शेखर जोशी बुधवारी रात्री उमेशनगर मधील तोंडवळकर विद्यालया समोरील चहाच्या टपरीवर चहा पित उभे होते. त्यांची दुचाकी टपरीच्या समोर उभी होती. चहा पिऊन झाल्यानंतर तक्रारदार जोशी जाण्यास निघाले. त्यावेळी त्यांच्या दुचाकीच्या समोर एक रिक्षा उभी होती. जोशी यांनी संबंधित रिक्षा चालकाला दुचाकी काढेपर्यंत रिक्षा थोडी बाजुला घे, अशी विनंती केली. त्या मागणीकडे दुर्लक्ष करत रिक्षा चालक तेथून निघून गेला. दुचाकी काढायची कशी असा प्रश्न निर्माण झाल्याने जोशी यांनी त्यांना पुन्हा रिक्षा काढण्याची विनंती केली. त्यावेळी रिक्षा चालकाने अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जोशी यांना रस्ता तुमच्या बापाचा आहे का. रिक्षा जागेवरून काढणार नाही, असे बोलून जोशी यांच्याशी वाद घातला. शाब्दिक चकमकीनंतर रिक्षा चालकाने रिक्षेत जाऊन पाठीमागे लपून ठेवलेला धारदार चाकू कमरेला लावला आणि दुसऱ्या हातात वजनदार दगड घेऊन तो जोशी यांच्या डोक्यात टाकण्याचा, तसेच चाकूची धमकी देऊन त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. टपरी जवळील काही नागरिक मध्ये पडल्याने मोठा अनर्थ टळला.

# ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या नागपूरात बदल्या

**■ठाणे। प्रतिनिधी,**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गृह विभागाने पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यास सुरूवात केली आहे. त्यानुसार ठाणे पोलीस दलातील १७ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या थेट जिल्ह्याबाहेर बदल्या करण्यात आल्या आहेत. यातील सर्वाधिक अधिकाऱ्यांच्या बदल्या या नागपूर शहर पोलीस दलात करण्यात आल्या आहेत. बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदारसंघ असलेल्या कोपरी-पाचपाखाडी मतदार संघातील वागळे इस्टेट, श्रीनगर आणि कोपरी या पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचा सामावेश आहे.

विशेष म्हणजे, बदल्या झालेले काही पोलीस अधिकारी ठाणे शहरातील मोक्याच्या पोलीस ठाण्यात बदलीच्या प्रयत्नात होते अशी चर्चा पोलीस दलात सुरू आहे. येत्या काही दिवसांत आणखी काही पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुका येत्या काही दिवसांत लागू शकतात. शहरात अनेक वर्ष काम करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचा थेट तेथील पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी किंवा लोकप्रतिनिधींसोबत परिचय असतो.

# नवी मुंबईत दोन दिवस रोटरी क्लबची परिषद; राज्याच्या शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, बदलापूर-अंबरनाथ, उल्हासनगर, भिवंडी-शहापूर आदी भागांतील रोटरी क्लबची वार्षिक परिषद ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी नवी मुंबईतील वाशी एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून पुढील दोन दिवस विविध क्षेत्रांतील मान्यवर या परिषदेत विचार मांडणार आहेत.

माजी खासदार डॉ. विनय सहस्राबुध्दे, अध्यात्मिक गुरू डॉ. स्वरुपानंद सरस्वती, राम मंदिर निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणारे टाटाचे प्रकल्प प्रमुख निलेश ताम्हाणे, परमवीरचक्र विजेते आणि कारगिल युध्दात लक्षणीय कामगिरी बजावणारे कॅ. योगेंद्र यादव, मेट्रो वुमन अश्विनी भिडे, आदित्य मोहिमेतील प्रमुख शास्त्रज्ञ निगर शाजी, वंदे भारतचे सुधांशू मणी, क्रिकेटपटू करसन घावरी, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. जगन्नाथ दीक्षित, डॉ. उदय निरगुडकर, अतिरिक्त पोलीस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील, जेनेरिक औषधांचा प्रचार करणारे अर्जुन देशपांडे, अंबा युध्दनौकेवरील पहिल्या महिला कमांडर इंदू प्रभा, जम्मू-काश्मिरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक आनंद जैन, अभिनेते मुनी झा, वास्तूशास्त्र तज्ज्ञ डॉ. रविराज अहिरराव, पर्यावरणतज्ज्ञ संतोष गोंधळेकर, आर्थिक सुरक्षातज्ज्ञ डॉ. अपूर्वा जोशी, डॉ. राधाकृष्ण पिल्ले, निवृत्त एअर चीफ मार्शल बिरेंद्रसिंग धनुआ आदी मान्यवर या परिषदेत विचार मांडणार आहेत, अशी माहिती रोटरी-३१४२चे प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी यांनी दिली.

# नालासोपाऱ्यात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या मालवाहतूक वाहनांना भीषण आग

**■वसई। प्रतिनिधी,**

नालासोपारा पूर्वेच्या धानिव बाग परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या मालवाहतूक वाहनांना भीषण आग लागल्याची घटना घडली आहे.

बुधवारी रात्री पावणे एकच्या सुमारास ही घटना घडली. या आगीत पाच ते सहा मालवाहतूक वाहने जळून खाक झाली आहेत. नालासोपारा पूर्वेच्या भागात धानिव बाग परिसर आहे. या परिसरात मालवाहतूक वाहने ही पार्किंग करण्यात आली होती. परंतु रात्रीच्या सुमारास या वाहनांमध्ये अचानक स्फोट होऊन आगीचा भडका उडाला होता.

आगीची तीव्रता अधिक असल्याने यात पाच ते सहा वाहनांनी पेट घेतला होता. या घटनेची माहिती मिळताच वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. एक ते दीड तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.

या घडलेल्या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून आगीत पाच ते सहा मालवाहतूक वाहने जळून खाक झाली आहेत असे अग्निशमन दलाच्या जवानांनी सांगितले आहे. रात्रीच्या सुमारास ही घटना घडल्याने आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली होती.

# खाडीपूल दुरुस्ती रखडल्याने उरणकर त्रस्त

**■उरण। प्रतिनिधी,**

सिडकोने उरण - पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडीपुलाच्या दुरुतीचे काम सुरू केले आहे. मात्र हे काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण होणार असल्याचे आश्वासन दिले होते. मात्र पुलाच्या दुरुस्तीचे काम धिम्यागतीने सुरू असल्याने ३१ जानेवारीची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे येथील बोकडवीरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या चार गावांतील हजारो नागरिकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

उरण-पनवेल मुख्य मार्गावरील हा खाडीपूल कमकुवत असल्याने या मार्गावरील एसटी व एनएमएमटी बस वाहतूक बंद करण्यात आली आहे. खाडीपूल त्वरित दुरुस्त करावा या मागणीसाठी ऑक्टोबरमध्ये जनवादी महिला संघटनेने सिडको कार्यालयावर आंदोलन केले होते. त्यावेळी सिडकोचे अधीक्षक अभियंता श्रीकांत गोसावी यांनी जानेवारी २०२४ पर्यंत पुलाची दुरुस्ती करून प्रवासी वाहनांसाठी खुला करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार कामाला सुरुवात झाली आहे. मात्र काम पूर्ण होण्यास विलंब लागत आहे. कारण पुलाचा मुख्य भाग अजून तसाच आहे. मागील तीन वर्षांपासून खाडीपूल प्रवासी वाहनांसाठी बंद असल्याने येथील नागरिक, विद्यार्थी यांना अधिक वेळ आणि खर्चाचा प्रवास करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून लांबलेला राज्य महामार्ग क्रमांक १०३ हा उरण चारफाटा, बोकडवीरा ते करळफाटा असा साडेसहा किलोमीटरचा मार्ग १ सप्टेंबरला सार्वजनिक बांधकाम विभागाने सिडकोकडे हस्तांतरित केला आहे. त्यामुळे मार्गावरील सिडको द्रोणागिरी कार्यालया समोरील खाडीपूल कधी दुरुस्त करणार असा सवाल नागरिकांकडून केला जात होता. या मार्गावरील हाईटगेटमुळे झालेल्या

अपघातात अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.

हाईटगेटमुळे सार्वजनिक वाहतूक बंद

२०२१ सालापासून सिडकोच्या द्रोणागिरी नोड कार्यालय व फुंडे स्थानकालगतच्या नादुरुस्त खाडी पुलामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गावरील जड व प्रवासी वाहो रोखण्यासाठी उरण-पनवेल मार्गावर हाईटगेट बसविले आहेत. बोकडविरा व फुंडे महाविद्यालयाजवळील दोन्ही बाजूच्या हाईटगेटमुळे अधिक उंचीच्या वाहनचालकांना उंचीचा अंदाज न आल्याने वाहनांचे अपघात होऊ लागले आहेत.

# पेणधरमधील सिडकोच्या लाभार्थींना सदनिकांचा ताबा मिळेना

**■पनवेल। प्रतिनिधी,**

पेणधर मेट्रो स्थानकालगत असणाऱ्या तळोजा वसाहतीमधील सेक्टर ३४ आणि सेक्टर ३६ या परिसरात सिडको महामंडळाने २०१९ मध्ये सोडतीमधून अल्प उत्पन्न गटाचे आणि अत्यल्प उत्पन्न गटाचे लाभार्थी दोन महिन्यांत निवडण्यात आले. करोना साथरोग सुरू होण्याचा हाच तो काळ असल्याने टाळेबंदी मार्च २०२० ला लागू झाली. सिडको मंडळाने २०२० मध्ये गृहकजार्ची प्रक्रिया पूर्ण करण्याचे सुचविल्यावर मार्च २०२३ मध्ये सदनिकांचा ताबा देऊ असे आश्वासन दिले. मागील वर्षभरापासून सर्व लाभार्थी कजार्चे हप्ते भरत आहेत. मात्र त्यांना अद्याप सिडको मंडळाने सदनिकांचा ताबा न दिल्याने सदनिकाधारक संतापले आहेत. सिडको महामंडळाने पनवेल आणि उरणमध्ये विविध चांगले प्रकल्प उभारले.

परंतू या प्रकल्पांचे उदघाटन मोठ्या व्यक्तीच्या हस्ते होण्यासाठी हे प्रकल्प पुर्ण झाल्यानंतरही त्याचा वापर जनतेला करु दिला जात नव्हता. बेलापूर ते पेणधर मेट्रो रेल्वे हे त्यासाठी सर्वात मोठे उदाहरण आहे. सिडको महामंडळाने तळोजा फेस २ मधील सेक्टर

३६ येथे २२७७ आणि सेक्टर ३४ येथे ७४६ सदनिका बांधण्यासाठी शिर्के कंपनीला काम दिले. २०१९ च्या सोडतीमध्ये लाभार्थ्यांना करोना साथरोगामुळे काही महिन्यांची प्रतिक्षा करावी लागणार हे जरी खरे असले तरी प्रत्यक्षात या महागृहनिर्माण प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्याचे येथील कामगारांनी सांगितले.

मात्र या लाभार्थ्यांना लोकसभेच्या निवडणूक आचारसंहितापूर्वी सदनिकांचा ताबा द्यायचा आहे का असा प्रश्न सर्वसामान्य लाभार्थ्यांना पडला आहे. शिर्के कंपनीने या इमारतींचे बांधकाम बांधून तयार केले असले तरी या इमारतींमपर्यंत पोहचण्यासाठीचा पोहच रस्ता सध्या चिखलात हरवला आहे.

# शाळांमधील खोटी पटसंख्या रोखण्यासाठी 'पेन'चा आधार

**■कल्याण। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातील अनेक शाळा खोटी पटसंख्या दाखवून त्या आधारे शाळेत परस्पर शिक्षक भरती करतात. या माध्यमातून शासनाची फसवणूक करतात, शाळेला अनुदान प्राप्त करून घेतात. जिल्हा परिषद ते खासगी शाळांमधील हे गैरप्रकार रोखण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना 'कायमस्वरुपी शिक्षण क्रमांक' (पर्मनन्ट अकाउंट क्रमांक-पेन) देण्याचा निर्णय घेतला आहे.

ठाणे जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पर्मनन्ट अकाऊंट क्रमांक (पेन) देण्यात येणार आहे. हा क्रमांक देण्यासाठी शिक्षण संस्थांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची नोंदणी यु-डायस प्लसच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने करायची आहे. ज्या

विद्यार्थ्यांची नोंदणी यु-डायस प्लसवर होईल. त्यांनाच 'पेन' क्रमांक मिळणार आहे, असे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अधिकाऱ्याने सांगितले. पेन क्रमांकामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती एकाच साधनाच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होणार आहे. प्रत्येक वेळी विद्यार्थ्यांला पूर्वी शिक्षण घेत असलेल्या शाळेतील नोंदणी क्रमांक घेऊन नवीन प्रवेशासाठी धावपळ करावी लागणार नाही. नवीन प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे नाव यु-डायस पध्दतीने तपासले की त्याची सर्व शैक्षणिक माहिती एकत्रितपणे तांत्रिक पटलावर उपलब्ध होणार आहे.

# दोन उड्डाणपुलांची कामे सुरू; वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून उपाययोजना

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

उरण फाटा तसेच तुर्भे स्टोअर परिसरातील उड्डाणपुलांची कामे सुरू करण्यात आल्याने वाहतूक वळवण्यात आली आहे. पावसाळ्यात सर्वाधिक त्रासदायक ठरलेल्या उरण फाटा उड्डाणपुलाच्या सिमेंट काँक्रिटीकरण कामाचा समावेश आहे. गेल्या पावसाळ्यात वाहनचालकांना प्रचंड डोकेदुखी ठरलेल्या शीव-पनवेल मार्गावरील उरण फाटा येथील उड्डाणपुलावरील सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम आता सुरू करण्यात येणार आहे.

त्यासाठी गेले दोन दिवस वाहतूक पोलिसांनी वाहतुकीबाबत प्रात्यक्षिक घेतले. खारघर, कळंबोली, पनवेल व इतर सर्व परिसरातील वाहनचालकांना वाहतूक

विभागाने पयार्यी मागार्चा अवलंब करावा असे आवाहन केले आहे. तुर्भे स्टोअर येथे उड्डाणपुलाच्या कामामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. या ठिकाणचा रस्ताच अपुरा पडत आहे. ही वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व नागरिकांची गैरसोय होऊ नये या करीता पयार्यी रस्त्यांचा वापर करावा असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

तुर्भे उड्डाणपुलाच्या कामानिमित्ताने ठाणेकडे जाताना चार पयार्यी मार्ग देण्यात आले आहेत. ठाणेकडे जाताना तुर्भे उड्डाणपुलाकडून सानपाडा वाशीमार्गे ठाण्याकडे जाऊ शकता. दुसरा मार्ग तुर्भे नाक्याहून एपीएमसी उड्डाणपूलमार्गे वाशी तसेच ठाणेकडे जाता येईल. तिसरा पयार्यी मार्ग तुर्भे नाक्यावरून उजवे वळण घेऊन एमआयडीसी मार्गे महापे, कल्याण व ठाणेकडे जाऊ शकतात. चौथा मार्ग म्हणजे तुर्भे उड्डाणपुलाखालून उजवे वळण घेऊन विवांता हॉटेलमार्गे एमआयडीसी मागार्ने महापेकडे जात पुढे ठाण्याकडे जाऊ शकता. ठाण्याकडून वाशी, बेलापूर वा पनवेलकडे जाण्यासाठी पावणे उड्डाणपुलावरून एमपीएमसी मार्केट रस्त्याने पुढे जाऊ शकतात.

# मनसेप्रमुख राज ठाकरे २ दिवस नाशिकमध्ये; लोकसभा, विधानसभेची ठरवणार रणनीती, असे होणार कार्यक्रम

**■नाशिक। प्रतिनिधी,**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नाशिक दौऱ्यानंतर आता 'मनसे' प्रमुख राज ठाकरे हेदेखील आज, गुरुवार (दि. १)पासून दोन दिवस नाशिक दौऱ्यावर येत आहेत.

नाशिक दौरा सुरू होण्यापूर्वीच ठाकरेंनी आपला चार दिवसांचा नियोजित दौरा दोन दिवसांवर आणला असून, या दोन दिवसांत लोकसभा व विधानसभा निवडणुकींची रणनीती आखली जाणार आहे. आता राज ठाकरेही नाशिकच्या राजकारणावर खल करणार असल्याने त्यांच्या या नाशिक दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपपाठोपाठ काँग्रेस, राष्ट्रवादी (अजित पवार व शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे व शिंदे गट) यांनीही लोकसभा निवडणुकांवर लक्ष केंद्रित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १२ जानेवारी रोजी नाशिकचा दौरा करीत भाजपच्या प्रचाराचा नारळ फोडला आहे. त्यानंतर उद्धव ठाकरेंनीही दि. २२ व २३ जानेवारी असे दोन दिवस नाशिकमध्ये तळ ठोकत लोकसभेचा नारळ फोडला होता. त्यापाठोपाठ आता राज ठाकरेही नाशिकमध्ये दोन दिवस तळ ठोकणार आहेत. राज यांचा दौरा प्रारंभी दि. १ ते ४ फेब्रुवारी असा चार दिवसांचा होता. त्यात आता दोन दिवसांची कपात करण्यात आली आहे.

आज, गुरुवारी (दि. १) सकाळी दहा वाजता राज यांचे नाशिकमध्ये आगमन होईल. त्यानंतर पक्षाच्या शाखा अध्यक्षांसाठी सकाळी राजगड कार्यालयात मार्गदर्शन शिबिर होईल. दुपारी एक वाजता ते ग्रामीण पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील. शुक्रवारी (दि. २) सकाळी दहा वाजता पक्षाच्या राजगड कार्यालयात पत्रकार परिषद घेतील. त्यानंतर विजय रणाते यांचे संदर्भग्रंथ प्रकाशन, जिल्ह्यातील मुख्याध्यापक व शिक्षकांशी, तसेच पक्षाच्या आध्यात्मिक आघाडीशी चर्चा आदी कार्यक्रम होतील. नंतर संत निवृत्तिनाथ संस्थानच्या शिष्टमंडळाची भेट, सुवर्णकार समितीशी चर्चा, तसेच पक्षाच्या महिला पदाधिकारी व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशीही चर्चा केली जाणार आहे.

# शरद पवार पक्षाचे सदस्य नसताना अध्यक्षपदी कसे?

## अजित पवार गटाच्या वकिलांचा युक्तिवाद; विधानसभा अध्यक्षांपुढे आमदार अपात्रतेबाबत सुनावणी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारिणीची निवड पक्ष घटनेनुसार झालेली नसून शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे यांच्या नियुक्त्या निवडणूक न घेताच केल्या होत्या. पक्ष घटनेनुसार शरद पवार हे पक्षाचे सदस्यही नसताना ते पक्षाध्यक्ष कसे होऊ शकतात? असा युक्तिवाद अजित पवार गटाचे वकील वीरेंद्र तुळजापूरकर यांनी बुधवारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रतेसंदर्भातील सुनावणी बुधवारी संपली असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार नार्वेकर यांच्याकडून १५ फेब्रुवारीपर्यंत निकाल अपेक्षित आहे.

ॲड. तुळजापूरकर म्हणाले, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसाठी निवडणूकच झाली नाही. जर ती झाली असती, तर त्याचे पुरावे निवडणूक आयोगाकडे दाखल करण्यात आले असते. राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक घेण्यात आली होती व त्या बैठकीचे शरद पवार हे अध्यक्ष होते. राज्य कार्यकारणीची निवडणूक घेण्यात येणार होती. मात्र शरद पवार यांनी निवडणूक न घेताच सर्व पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. पक्षाची घटना, विधिमंडळ आणि पक्षातील बहुमत कोणाकडे आहे, या तीन बाबींचा विचार अध्यक्षांनी निर्णय देताना करणे, हे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार आवश्यक आहे. शरद पवार यांना विधिमंडळ पक्षातील बहुमत आजपर्यंत सिद्ध करता आलेले नाही. आपण सरकारमध्ये सहभागी व्हायचे नाही, हा निर्णय शरद पवार यांनी एकट्याने कसा घेतला? भाजपबरोबर सरकारमध्ये सामील होऊ नये, असे पक्षाच्या घटनेत नाही आणि पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची लेखी सूचनाही नाही.

# धारावी बचाव आंदोलनाची रविवारची सभा लांबणीवर

**■मुंबई । प्रतिनिधी,**

धारावी पुनर्विकासाअंतर्गत ५०० चौ फुटाचे घर मिळावे यासह अन्य मागण्यांसाठी धारावीकरांनी धारावी बचाव आंदोलनाच्या माध्यमातून आंदोलन तीव्र केले आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून रविवार, ४ फेब्रुवारी रोजी धारावीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र काही कारणास्तव ही सभा पुढे ढकलण्यात आली आहे.

धारावी पुनर्विकासाअंतर्गत पात्र धारावीकरांना ३५० चौ फुटाची घरे देण्याचे धारावी पुनर्वसन प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेडने (डीआरपीपीएल) जाहीर केले आहे. मात्र धारावीकर ५०० चौ फूट घराच्या मागणीवर ठाम आहेत. तर दुसरीकडे धारावीतील अपात्र रहिवाशांनाही पुनर्विकासात सामावून घेऊन त्यांचेही पुनर्वसन केले जाणार आहे. मात्र या अपात्र रहिवाशांना धारावीबाहेर घरे देण्यात येणार आहेत.

यासाठी डीआरपीपीएलने नुकतेच मुंबई महानगर पालिकेला एक पत्र पाठवून मुलुंडमधील ६४ एकर जागेची मागणी केली आहे. यासाठी अन्य ठिकाणीही जागा शोधण्यात येत आहे. त्यामुळे अनेक धारावीकर अपात्र म्हणून धारावी बाहेर फेकले जाणार आहेत. याला धरावीकरांचा विरोध आहे.

सरसकट सर्व अपात्र-पात्र धारावीकरांना धारावीतच घरे द्यावीत अशी मागणी धारावीतील रहिवाशांची आहे. याच मागण्यांसाठी आता धारावी बचाव आंदोलनाच्या माध्यमातून अदानी विरोधातील आंदोलन तीव्र करण्यात आले आहे. रविवारी ९० फुटी रोड येथे एका जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला सर्व पक्षाचे नेते उपस्थित राहणार होते. मात्र आता ही जाहीर सभा रद्द करण्यात आल्याची माहिती धारावी बचाव आंदोलनाचे समनव्यक ॲड. राजू कोरडे यांनी दिली. पोलिसांची परवानगी, जागेची अडचण आणि इतर कारणाने ही सभा रद्द करावी लागली आहे.

# द्रुतगती मार्गावर अपघातात टेम्पोचालकासह दोघांचा मृत्यू

**■पुणे। प्रतिनिधी,**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर औंढे पुलाजवळ सेवा रस्त्यावर थांबलेल्या वाहनावर भरधाव टेम्पो आदळून टेम्पोचालकासह दोघांचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली.

टेम्पोचालक सुनील जालिंदर कांबळे (वय ४०, रा. कळंबी, ता. विटा, जि. सांगली), विष्णू भीमराव गाडे (वय ५५, रा. राजापूर, ता. तासगाव, जि. सांगली) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. सांगलीहून मुंबईला द्राक्ष वाहतूक करणारा टेम्पो निघाला होता.

द्रुतगती मार्गावर लोणावळा परिसरात औंढे पुलाजवळ सेवा रस्त्यावर एक वाहन थांबले होते. टेम्पोचालक कांबळे यांचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो सेवार रस्त्यावर थांबलेल्या वाहनावर आदळला. अपघातात टेम्पोचे मोठे नुकसान झाले.

अपघाताची महिती मिळताच महामार्ग पोलीस, लोणावळा ग्रामीण पोलीस, रस्ते विकास महामंडळाचे देवदूत पथक, आयआयबीच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

# अमली तस्करीला चाप; अरबी समुद्रात वर्षभरात एकदाच गैरप्रकार समोर

**■मुंबई। प्रतिनिधी,**

तटरक्षक दलाने अरबी समुद्रावरील देखरेख व टेहळणी करडी केल्याने वर्ष २०२३मध्ये अरबी समुद्रात केवळ एकच अमली पदार्थ तस्करी झाल्याचे समोर आले आहे. त्यामध्ये ४७७ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. तटरक्षक दलाच्या स्थापनेनंतर प्रथमच इतकी कमी तस्करी पश्चिम समुद्री क्षेत्रात झाली आहे. १ फेब्रुवारी या भारतीय तटरक्षक दिनाच्या निमित्ताने ही बाब महत्त्वाची बाब ठरते. देशाच्या सागरी किनारपट्टीपासून १२ सागरी मैल अंतरापर्यंतच्या समुद्रावर देखरेख ठेवण्यासाठी १ फेब्रुवारी, १९७७ रोजी तटरक्षक दल कार्यान्वित झाले. यानिमित्ताने हा दिवस साजरा होता. दल १९७७मध्ये कार्यान्वित झाल्याने पश्चिम समुद्री क्षेत्रासह या दलाचे विविध विभाग १९७८पासून स्थापन होऊ लागले. त्यानुसार १९७८ ते २०२३ यादरम्यान पश्चिम समुद्री क्षेत्रात एकूण १५ हजार ३४३.०४ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. तर २०२३मधील हा आकडा ४७७.९६ कोटी रुपये होता. याबाबत दलाचे पश्चिम क्षेत्राचे महानिरीक्षक भिषम कुमार यांनी सांगितले, 'अफगाणिस्तानात तालिबान राजवट आल्यापासून पाकिस्तानमार्गे गुजरात व तेथून अरबी समुद्रातून पश्चिम किनारपट्टीवर अमली पदार्थ तस्करीचे प्रयत्न वाढले आहेत. मात्र २०२३मध्ये तटरक्षक दलाने टेहळणीची पद्धत बदलली तसेच अन्य संस्थांकडून सातत्याने गुप्त माहितीची देवाण-घेवाण सुरू झाल्याने संपूर्ण वर्षात एकच घटना घडली. याखेरीज तटरक्षक दलाच्या पश्चिम क्षेत्राने १९७८ ते २०२३ यादरम्यान ३ लाख ३१ हजार ५४८ वेळा विविध संशयास्पद बोटी, नौकांची प्रत्यक्ष तपासणी केली.

# पुणे महापालिकेत सॅनिटरी नॅपकीन खरेदीमध्ये एजंटगिरी

**■पुणे। प्रतिनिधी,**

महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिन पुरविण्यावरून सत्ताधारी पक्षातील एक आमदार आणि एका खासदार एजंटगिरी करीत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या लोकप्रतिनिधींना सामाजिक भान राहिले नसून, शाळकरी मुलींच्या सॅनिटरी नॅपकिन'च्या खरेदीत तरी एंजटगिरी करू नये, अशी टीका पुणे शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा संगीता तिवारी यांनी केली आहे. महापालिका प्रशासनाने गेल्या वर्षी महापालिका शाळांतील विद्यार्थींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली होती. यातील अपात्र ठेकेदारास पात्र केल्याचा आरोप शिवसेनेचे उत्तर नगरचे खासदार सदाशिव लोखंडे यांनी महापालिकेला पाठवलेल्या पत्रात केला होता. मात्र, भाजपचे आमदार सुनील कांबळे यांनी संबंधित कंपनीची निविदा दबाव टाकून पात्र केली होती. या वादामुळे शाळकरी मुलींना सॅनिटरी नॅपकिन मिळाले नाहीत,ह्ल असा आरोप संगीता तिवारी यांनी केला आहे. त्यानंतर काँग्रेसने थेट लोकप्रतिनीधींवर आरोप करून, या निविदा प्रक्रियेतील गोंधळावर भाष्य केले. महापालिकेचा अर्थसंकल्प हा आठ हजार कोटी रुपयांचा असून, दोन हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. भौगौलिकदृष्ट्या सर्वांत मोठी महापालिका असणाऱ्या पुणे महापालिकेला सीएसआर'च्या माध्यमातून सॅनिटरी नॅपकिन घ्यावे लागत असल्याचे दुदेर्वी परिस्थिती आहे.

# पोलीस अधिकारी अंकित गोयल यांच्याकडे पुन्हा गडचिरोलीची धुरा; अधीक्षकपदाच्या कार्यकाळात ५५ नक्षलवाद्यांना कंठस्नान !

**■गडचिरोली। प्रतिनिधी,**

सव्वा वर्षांपूर्वी गडचिरोलीतून पुण्याला गेलेले पोलीस अधिकारी अंकित गोयल यांना बढती देत पुन्हा गडचिरोलीची जबाबदारी देण्यात आल्याने नक्षलवाद्यांची चिंता वाढली आहे. त्यांनी आपल्या गडचिरोली पोलीस अधीक्षक पदाच्या कार्यकाळात राबवलेल्या आक्रमक नक्षलविरोधी अभियानात मिलिंद तेलतुंबडे सारख्या मोठ्या नक्षलनेत्यासह तब्बल ५५ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले होते. त्यामुळेच त्यांच्यावर गडचिरोलीच्या पोलीस उपमहानिरीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आल्याचे बोलल्या जात आहे.

राज्य पोलीस दलात बुधवारी झालेल्या खांदेपालटानंतर अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. यात पुण्याचे पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांना बढती देत गडचिरोलीचे पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. २०१९ मध्ये कुरखेडा तालुक्यातील जांभुळखेडा मार्गावर नक्षल्यांनी घडवून आणलेल्या भूसुरुंगस्फोटात १५ पोलीस जवान शहीद झाले होते. त्यानंतर अंकित गोयल यांच्याकडे गडचिरोलीच्या पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी आपल्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात नक्षल्यांच्या बिमोडासाठी विशेष रणनीती आखून नक्षलविरोधी अभियान राबवले. सोबतच दादालोरा खिडकी सारखे उपक्रम सुरू करून पोलीस आणि आदिवासींमध्ये एक संवाद सेतू निर्माण केला. यात त्यांना मिळालेल्या यशामुळे नक्षल चळवळीचे कंबरडेच मोडल्या गेल्याचे बोलले जाते. यादरम्यान झालेल्या चकमकीत गडचिरोली पोलीस दलाच्या नक्षलविरोधी सी ६० पथकाने ५५ नक्षल्यांना ठार केले, तर ६१ नक्षल्यांना अटक करण्यात आली. या दरम्यान १९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते.

विशेष म्हणजे नक्षल्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य तसेच दंडकारण्य झोनचा प्रमुख मिलिंद तेलतुंबडे याला ठार करण्यात यश आल्याने नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला. यात अनेक महत्वाचे नक्षल नेते ठार झाले होते. तेव्हापासून जिल्ह्यात नक्षल कारवायांवर अंकुश आहे. वर्तमान पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी ती परंपरा कायम ठेवली आहे. त्यामुळेच मागील तीन वर्षांपासून नक्षल्यांचे अनेक मोठे नेते भूमिगत झाले. तर काही अबुझमाडमध्ये पळून गेले. केवळ सीमाभागात नक्षल्यांच्या हालचाली आहेत. परंतु गडचिरोलीत प्रभावी कामगिरी करणारे संदीप पाटील यांना बढती देत नक्षलविरोधी अभियानाचे महानिरीक्षक तर त्यांच्या जागी अंकित गोयल यांची नियुक्ती करण्यात आल्याने शेवटची घटका मोजत असलेली नक्षल चळवळ संपुष्टात येईल, अशी आशा पोलीस वतुर्ळात व्यक्त केल्या जात आहे.

# पिंपरी महापालिकेच्या 'या' रुग्णालयांच्या परिसरात मिळणार स्वस्त दरामध्ये औषधे

**■पिंपरी। प्रतिनिधी,**

महापालिकेच्या वायसीएम, नवीन थेरगाव, आकुर्डी, नवीन जिजामाता, नवीन भोसरी या पाच रुग्णालयांच्या परिसरात जेनेरिक औषधांची दुकाने सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला आता स्वस्त दरामध्ये रुग्णालय परिसरातच औषधे मिळण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेचे ३२ दवाखाने आणि आठ मोठी रुग्णालये आहेत. संत तुकारामनगर येथे महापालिकेचे ७५० खाटांचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय आहे. पुणे जिल्ह्यातील नागरिक उपचारासाठी महापालिकेच्या रुग्णालयात येतात. अनेकदा रुग्णांना आवश्यक असणारी औषधे महापालिका रुग्णालयात उपलब्ध नसतात. त्यामुळे नाइलाजानेखासगी दुकानामधून औषधे आणावी लागतात. औषधे महागडी असतात. त्यामुळे महापालिकेच्या पाच रुग्णालय परिसरात जेनेरिक औषधांची दुकाने सुरू केली जाणार आहेत.

नॅकोफ इंडिया लिमिटेड या कंपनीला महापालिका रुग्णालय परिसरात अमृत स्टोअर्सच्या धर्तीवर जेनेरिक औषधांचे दुकान सुरू करण्यासाठी थेट पद्धतीने भाडेतत्त्वावर जागा उपलब्ध करून देणार आहे. कंपनीला १५० ते १८६ चौरस फूट क्षेत्रफळाचे पाच गाळे दरमहा ३२ हजार २४२ रुपये भाडेदराने दहा वर्षांसाठी देण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या आयुष्मान भव मोहिमेंतर्गत शहरातील १८ वर्षे व त्यावरील सर्व पुरुषांची आरोग्य तपासणी महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह सर्व रुणालये व दवाखान्यांत मोफत करण्यात येतात.

# मौजमजेसाठी दुचाकी चोरणारा सराईत जेरबंद; १२ दुचाकी जप्त

**■पुणे। प्रतिनिधी,**

जिल्ह्यातील विविध भागातील दुचाकी मौजमजेसाठी चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला हिंजवडी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून ३ लाख ६० हजारांच्या १२ दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. सूर्यकांत बळीराम आडे (वय २५ वर्ष) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी एकूण १२ गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तानाजी मधुकर आमले यांची दुचाकी चोरीला गेली होती. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास करत असताना गुन्ह्यातील आरोपी सराईत असल्याची माहिती पोलीस हवालदार केंगले यांना मिळाली. आरोपी सूर्यकांत हा पिंपळे सौदागर येथे राहत होता. दरम्यान, वाकड परिसरात आरोपी हा पांढऱ्या रंगाच्या दुचाकीवर असल्याची माहिती बातमीदारामार्फत हिंजवडी पोलिसांना मिळाल्यानंतर तात्काळ तिथं जाऊन त्याला अटक करण्यात आली. आरोपी सूर्यकांत याने पुणे जिल्ह्यातील इंदापूर, हडपसर, चिखली, तळेगाव, हिंजवडी, वाकड परिसरात मौजमजेसाठी दुचाकी चोरी केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. आरोपीकडून १२ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

# क्रीप्टो करन्सीतील गुंतवणुकीतून चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून रहिवाशाची फसवणूक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

क्रीप्टो करन्सीमध्ये (कूट चलन) गुंतवणुकीच्या नावाने ५२ वर्षीय शेअर ट्रेडरची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी आरोपीने बँक खात्यातून साडे सहा लाख रुपये काढले. याप्रकरणी खार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरूवात केली आहे.

तक्रारदार खार येथे राहत असून शेअर ट्रेडिंगचे काम करतो. १९ जानेवारीला त्यांना व्हॉटस ॲप क्रमांकावरुन नोकरीविषयी विचारणा केली होती. सोनाली अहुजा असे नाव सांगर्णाया या महिलेने आपण ईबेमधून बोलत असल्याचे सांगितले. नंतर एका टेलिग्राम ग्रुपमध्ये सामिल करुन तक्रारदाराला युट्यूब चॅनेलच्या एका चित्रफीतीला लाईक करण्यास सांगितले. चित्रफीत लाईक केल्यानंतर काही रक्कम तक्रारदाराच्या खात्यात जमा झाली. त्याद्वारे आरोपींनी तक्रारादाराचा विश्वास संपादन केला. त्यानंतर मोबाइलवरुन त्याना किप्टो करन्सीची एक लिंक पाठविण्यात आली होती. त्यात युजर नेम आणि पासवर्ड तयार करण्यास आणि नंतर गुंतवणुक करण्यास सांगण्यात आले. या गुंतवणुकीवर त्यांना हमखास चांगला परतावा मिळेल, असे साक्षी नावाच्या एका महिलेने त्यांना सांगितले. त्यानंतर तक्रारदाराने स्वतःचे आभासी खाते उघडून सहा दिवसांत सहा लाख ४० हजार रुपये जमा केले. या गुंतवणुकीवर चांगला परताता मिळत असल्याने तक्रारदाराच्या खात्यावर दिसत होते. मात्र त्यांना या खात्यातून पैसे हस्तांतर करता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी साक्षीबरोबर संपर्क साधला असता तिने वाद घालण्यास सुरूवात केली.

त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे तक्रारदाराच्या लक्षात आले. त्याने याप्रकरणी खार पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी फसवणूक, तोतयागिरी व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. तक्रारदारांनी जमा केलेली रक्कम नागपूर व जयपूर येथील बँक खात्यांवर वर्ग झाली आहे. त्या माहितीच्या आधारे पोलीस अधिक तपास करत आहेत.

# ई-चलान पेमेंट लिंकवर क्लिक; करेल बॅक अकांऊंट रिकामं

**■नाशिक। प्रतिनिधी,**

'वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने तुमच्या वाहनावर ई-चलान अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे', या आशयाचा बनावट इंग्रजी मेसेज पाठवून 'फेक ऍप'ची लिंक सायबर चोरट्यांनी व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. नाशिक शहरातील अनेक वाहनचालकांना या स्वरूपाचे बनावट 'ई-चलान' पाठविण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून या स्वरूपाचे ऍप डाउनलोड न करण्याची सूचना वाहतूक पोलिसांनी केली आहे. नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेत काही दिवसांपासून नागरिक ई-चलान अंतर्गत झालेल्या कारवाईसंदर्भात चौकशी करीत आहेत. याबाबत पोलिसांनी खातरजमा केल्यानंतर सायबर चोरट्यांनी वाहतूक ई-चलानबाबत व्हॉट्सऍपद्वारे बनावट मेसेज व्हायरल केल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. त्या अन्वये, वाहतूक उपायुक्त चंद्रकांत खांडवी आणि सहायक आयुक्त आनंदा वाघ यांचे पथक सायबर चोरट्यांचा माग काढत आहेत. दरम्यान, ज्या नागरिकांना व्हॉट्सऍपद्वारे ई-चलानचे मेसेज आले असतील.

# घरातील ईडापिडा अन् आजारपण तांत्रिक विद्येचा वापर करुन दूर करण्याचा दावा, भोंदूकडून लाखोंची फसवणूक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

घरातील आजारपण आणि इतर ईडापिडा धार्मिक विधी करून दूर करतो, असे सांगून एका भोंदूने शिवडीतील महिलेला आणि तिच्या मैत्रिणीला सुमारे १७ लाखांची फसवणूक केली. तावीज, बळी तसेच वेगवेगळ्या धार्मिक विधीसाठी त्याने रोख रक्कम आणि सोने घेतले. काळ्या जादूने फसवणूक करणाऱ्या या भोंदूविरुद्ध रफी अहमद किडवाई मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरामध्ये काही काम केले तर लगेच अंगदुखी जडते, कंबरदुखीने तर आधीपासूनच पछाडले आहे, असे शिवडीत राहणाऱ्या सायराची तक्रार होती. अशातच सायराचा दूरचा नातेवाईक अबुबकार शेख हा बऱ्याच दिवसांनी तिच्या घरी आला. त्याने सायराच्या या तक्रारी ऐकल्या. औषधोपचार करून काहीच फरक पडत नसल्याने आपल्याकडील तांत्रिक विद्येचा वापर करून ही दुखणी घालवू शकतो, असे त्याने सांगितले. मात्र यासाठी काही रोख रक्कम आणि काही सोने द्यावे लागेल, असे तो म्हणाला. घरातील कायमची कटकट आणि दुखणी जाणार असल्याने सायरा खर्च करायला तयार झाली.

अबूबकार याने टप्प्याटप्प्याने थोडेथोडे करून पैसे आणि सोन्याचे दागिने घेण्यास सुरुवात केली. ज्याप्रमाणे सायरा पैसे आणि सोने देत होती त्यानुसार तो काहीतरी धार्मिक विधी केल्याचे भासवायचा. कधी मंतरलेले तावीज द्यायचा, तर कधी बकऱ्याचा बळी द्यायचा सांगून पैसे घ्यायचा. सुमारे १७ तोळ्यांचे दागिने आणि सहा लाख रुपये रोख सायरा हिने अबूबकारला दिले. मात्र तब्येत काही सुधारत नव्हती. घरामध्ये वादविवाद सुरूच होते. अबूबकार मात्र काही ना काही सांगून टाळाटाळ करीत होता. हे पाहून आपली फसवणूक झाल्याचे सायरा हिच्या लक्षात आले आणि तिने पोलिस ठाण्यात तक्रार केली.

बारा दिवसांत मृत्यूची भीती

सायरा हिने अबूबकार याच्या धार्मिक विद्येबाबत तिच्या मैत्रिणीला सांगितले. मैत्रिणीला कर्करोग होता, मात्र उपचार करूनही बरा होता नसल्याने मैत्रिणीने अबूबकार याच्याशी संपर्क केला. त्याने तुझा बारा दिवसांत मृत्यू होणार असल्याचे सांगितले. सायराची मैत्रिणही अबूबकारकडून धार्मिक विधी करून घेण्यास तयार झाली. मंत्रतंत्र, धार्मिक विधी करण्यासाठी अबूबकार याने तिच्याकडून सात तोळ्याचे दागिने आणि २१ हजार रुपये रोख घेतले.